वि. दि. दावा क्र. ५१३-२०२३
निशाण क्र. ५८ ची पुरवणी

<u>वादी यांचे साक्षीदार क्र. ३ यांची उलटतपासणी प्रतिवादी तर्फे वकील श्री. बी.टी.देवी यांचे तर्फे शपथेवर सुरु –</u>

माझे शिक्षण इयत्ता सहावी पर्यंत झालेले असून मला मराठी वाचता येते. मी वादी लुणिया यांचेकडे व्यवस्थापक म्हणून काम करत असलेबाबत माझे कडे दस्तऐवज पुरावा नाही. मला व्यवस्थापक म्हणून १५,०००/– हजार पुरावा दिला जातो. मला पगार रोख स्वरुपात दिला जातो. मला दिल्या जाणा–या पगाराची जमा–खर्चाची नोंदवही माझे मालक सांभाळतात. मी पगार दिल्यानंतर त्याची नोंद घेतल्याबाबत पाहिलेले आहे. मी सदर नोंद वहया बाबत पुरावा देण्यास तयार आहे.

गट नं. १९९ हा माझे माहितीचा आहे. त्या गटाचे क्षेत्र अडीच एकर आहे. मी त्या गटाचा ७/१२ उतारा पाहिलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट नं. १९९ हा संपूर्ण बळीराम चिंचकर यांचे मालकीचा आहे. माझे माहिती प्रमाणे गट नं. १९९ कामी बळीराम यांचे समवेत आणखी लोकांची नावे आहेत. त्या गटामध्ये बळीराम यांचे व्यतिरिक्त ५ लोकांची नावे आहेत. त्यांची नावे मला सांगता येणार नाहीत. त्या ५ लोकांच्या नावे प्रत्येकी किती क्षेत्र आहे हे सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, गट नं. १९९ चा बळीराम यांचे शेतीचा ७/१२ उतारा मी कधीही पाहिलेला नाही.

हे म्हणणे खरे आहे की, दि. १६–०१–२०१६ रोजी गट नं. १९९ मधील जमिन बळीराम याने विकसनाकरिता दिलेली होती. हे म्हणणे खरे आहे की, बळीराम याने गट नं. १९९ हा संपूर्ण पणे दिलेला होता. दि. १६–०१–२०१६ रोजी करारनामा लिहिलेला होता. सदरचा करारनामा हा बळीराम चिंचकर याने सुनिल लुणिया यांचे हक्कात पूर्ण गटाचा लिहून दिलेला होता. साक्षीदार पुन्हा कथन करतो की, त्याचे घरचे सुध्दा होते. त्यामध्ये बळीराम यांचा मुलगा व पत्नी होती. मी तो करारनामा करते वेळेस मी तेथे हजर नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, त्या करारनाम्यात त्या दोघांमध्ये काय ठरले हे मला वैयक्तीकरित्या माहिती नाही. हे मला सांगता येणार नाही की, गट नं. १९९ मध्ये विकसनाकामी बांधकाम कधी सुरु केले. हे मला सांगता येणार नाही की,

बिनशेती आदेशाकरिता चलन नेमके कोणत्या तारखेस भरले. हे मला सांगता येणार नाही की, ते चलन किती रुपयाचे भरले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी चलन भरलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, चलनावर माझी स्वाक्षरी नाही. मला मोजणी केलेबाबतची निश्चित तारीख सांगता येत नाही. मोजणी करतेवेळी मोजणी कार्यालयाचे दोन व्यक्ती होत्या. मी मोजणी करतेवेळी मोक्यावर हजर होतो. सदरची मोजणी ही मशिनद्वारे करण्यात आली. मोजणीदाराने मोजणी करते वेळी हद्दी खुणा निश्चित केल्या होत्या. त्यांनी खुणा निश्चितीकामी सिमेंटचे पोलचा उपयोग केला होता. त्या निश्चित केलेल्या खुणा जायमोख्यावर कायम आहेत. हे म्हणणे खरे नाही की, जायमोख्यावर कोणत्याही प्रकारच्या खुणा निश्चित केलेल्या नाहीत व सिमेंटचे पोलदेखील रोवलेले नाहीत.

जमिनीचे लेव्हलींग ट्रॅक्टर व जेसीबीने केली. हे मला सांगता येणार नाही की, ते कामी किती दिवस चालले व कोणत्या तारखेस चालले. मला मला सपाटीकरणासाठी वापरलेल्या ट्रॅक्टर व जेसीबीचा क्रमांक सांगता येणार नाही. मला मालकाचे नाव सांगता येईल. त्यांचे नाव सचिन सावंत असे होते. ती दोन्ही वाहने त्यांचेच मालकीचे होते. हे मला सांगता येणार नाही की, ट्रॅक्टर व जेसीबीच्या मालकास एकूण किती रक्कम अदा केली. आम्ही जेसीबी मशिनच्या सहाय्याने बांध सरळ केला. त्या बांध सरळ करणेकामी किती रक्कम दिली हे मला सांगता येणार नाही. तेथे आम्ही ७ पोल उभे केले. सदरचे पोल पुराणिक यांचेकडून खरेदी केले. ते किती रक्कमेस खरेदी केले ते सांगता येणार नाही. मुरुम ट्रॅक्टरच्या सहाय्याने रस्ता तयार करण्यासाठी भरला परंतू तो किती ट्रॉली भरला हे सांगता येणार नाही. ते ट्रॅक्टर सुध्दा सावंत यांचे मालकीचा होता. हे मला सांगता येणार नाही की, त्या मुरुमाकामी किती रक्कम अदा केली. तेथे रोलरच्या सहाय्याने रस्ता दाबण्यात आला. तो रोलर सुध्दा सावंत यांचे मालकीचा होता. हे मला सांगता येणार नाही की, रोलींग कामी सावंत यांना किती रक्कम अदा केली. हे मला सांगता येणार नाही की, तेथे ड्रेनेज कामी किती पाईप लागले. सदरचे पाईप हे श्रीगोंदा येथून कोथमिरे यांचेकडून खरेदी केले. त्याची तारीख व ते कधी खरेदी केले हे मला सांगता येणार नाही. त्याची रक्कम मला सांगता येणार नाही. त्या पाईपच्या बिलाबाबत

मला माहिती नाही. हे मला सांगता येणार नाही की, पिण्याच्या पाण्याचे किती पाईप टाकले. हे मला सांगता येणार नाही की, पाईप कोणाकडून खरेदी केले. हे मला सांगता येणार नाही की, सदर पाईप करिता किती रक्कम दुकानदारास अदा केली. गट नं. १९९ मध्ये ओढा असल्यामुळे त्यावरती पुलाचे काम केले. त्या कामी नळी, सिमेंट स्टील या बाबी श्रीगोंदा येथील कोथमिरे यांचेकडून आणले. त्या कामी दुकानदारास किती रक्कम दिली हे मला सांगता येणार नाही. त्या बिलाबाबती मला माहिती नाही. तेथे बांधकाम म्हणून कूपंन बांधले. त्या बांधकामाकामी किती खर्च आला हे मला सांगता येणार नाही. माझे कडे त्या बांधकामाचे बिल नाही. हे मला सांगता येणार नाही की, रस्त्याच्या कडेला लावण्यासाठी किती झाडे आणली. सदरची झाडे वंजारवाडी येथून आणली. हे मला सांगता येणार नाही की, ती झाडे नेमकी कोणाकडून आणली. हे म्हणणे खरे नाही की, ती झाडे आणण्यासाठी मी स्वतः गेलो नव्हतो. हे मला सांगता येणार नाही की, त्या झाडाकामी किती रक्कम देण्यात आली. हे म्हणणे खरे आहे की, वरील सर्व कामाचा जमा–खर्चाचा लेखा आमच्याकडे आहे. मी तो लेखा न्यायालयात दाखल करण्यास तयार नाही.

प्रश्न – तुम्हाला कोणत्या घटकासाठी किती खर्च झाला हे सांगता येत नाही मग तुम्ही शपथपत्रात १५, ९०,०००/– हा खर्च कशाच्या आधारे नमुद केला?

उत्तर – जसा जसा खर्च झाला तसा तसा नमुद केला.

पुराव्याचे शपथ पत्र तयार करते वेळी मी तेथे हजर होतो. हे म्हणणे खरे नाही की, माझे सरतपासातील मजकुर वादी सुनिल लणिया यांचे सांगण्यावरुन लिहिण्यात आला. पुराव्याचे शपथपत्र तयार करते वेळी कोणत्या घटका साठी किती खर्च आला हा मी टंकलिखीत करते वेळी सांगितला नव्हता व जमा खर्चाच्या वहया त्यास दाखविल्या नव्हत्या. हे मला सांगता येणार नाही की, परस्पर दुसरा कोणत्याही विकसकाची निवड केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी याने कोणताही दुसरे विकसकाची नेमणुक केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सुनिल लुणिया यांचेकडे कामास असल्यामुळे त्यांना मदत होणेकामी आज रोजी न्यायालयात खोटा पुरावा देत आहे. हे म्हणणे खरे

नाही की, मी पुराव्याचे खोटे शपथपत्र दाखल केले असून आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण, फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती,

(एस.एम.घुगे)

दि. २५–०३–२०२५ दिवाणी न्यायाधीश व.स्तर, करमाळा